असा. क्र. २१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, मे ४, २००६/वैशाख १४, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.**—मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . १६१-१६२

दिनांक ४ मे २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ४ मे २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

### मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९२३ चा मुंबई १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.



[**किंमत** : रुपये ९.००]

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ याच्या कलम ३ मध्ये,--- १९२३ चा मुंबई १.

(क) पोट-कलम (४) मधील तक्त्याऐवजी पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :---

**“ तक्ता**

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रति दूरचित्रवाणी संचावरील, प्रति महिना भरावयाची, करमणूक शुल्काची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सर्व महानगरपालिका आणि सर्व कटक क्षेत्रे यांच्या हद्दींमध्ये. | ४५ |
| २ | सर्व ‘ अ ’ आणि ‘ ब ’ वर्ग नगरपरिषदांच्या हद्दींमध्ये. | ३० |
| ३ | वरील नोंदी १ आणि २ यांमध्ये समाविष्ट न होणाऱ्या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दींमध्ये. | १५ ” ; |

(ख) पोट-कलम (१५) मधील तक्त्याऐवजी पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :—

**“ तक्ता**

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रति दूरचित्रवाणी संचावरील, प्रति महिना भरावयाची, करमणूक शुल्काची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सर्व महानगरपालिका आणि सर्व कटक क्षेत्रे यांच्या हद्दींमध्ये. | ४५ |
| २ | सर्व ‘ अ ’ आणि ‘ ब ’ वर्ग नगरपरिषदांच्या हद्दींमध्ये. | ३० |
| ३ | वरील नोंदी १ आणि २ यांमध्ये समाविष्ट न होणाऱ्या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दींमध्ये. | १५ ”. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई